

# 75 YEARS OF INDIAN INDEPENDENCE

## and Changing Nature of National Security



*Edited by*

**Prof. (Dr.) C. B. Bhange | Dr. Shikha Shrivastva**

**Dr. Kalpna Vaishy | Dr. Bharati Hiremath**

**Dr. V. M. Suneela Shyam | Devidas Vijay Bhosale**

**Mrs. Kanta Verma | Dr. Sabahat Rafiq Qazi**

**Dr. Alpana Sharma**

11. India's Strategic Planning With Neighbouring Countries — 88
*Dr. Deepak S. Vede*

12. भारत-आसियान सुरक्षा सम्बन्ध — 99
*शुभम सिंह*

13. संयुक्त राष्ट्र एवं भारत — 108
*डॉ जितेन्द्र कुमार*

14. स्वतंत्र भारत में महिला सुरक्षा हेतु प्रमुख प्रावधान: एक अवलोकन — 118
*डॉ. रजनी दुबे*

15. लोक संस्कृति और भारतीय स्वतंत्रता संग्राम — 125
*डॉ आदित्य विक्रम सिंह*

16. भारत की सुरक्षा के समक्ष चीन की वर्तमान चुनौतियाँ — 134
*मुकेश कुमार प्रजापति*

17. स्वतंत्रता के उपरांत भारत में महिलाओं के क्षेत्र में हुए समाज सुधार — 141
*डॉ किशोरी सोनी*

18. भारत में हाइब्रिड युद्ध : अवधारणा चुनौतियॉ एवं संभावनाएं — 148
*शिवेश बहादुर सिंह*

19. राष्ट्र निर्माण में युवाओं की भूमिका — 161
*डॉ. राजू प्रसाद अहरवाल*

20. आपदा प्रबंधन: कोरोना महामारी एवं सुरक्षा बलों के विशेष संदर्भ में — 171
*सतीश चंद्र यादव*

21. भारतीय स्वतंत्रता आन्दोलन में सुभाषचन्द्र बोस की भूमिका — 179
*डॉ. बीरेन्द्र कुमार तिवारी*

22. महान नायक मेजर सोमनाथ शर्मा — 185
*शशांक मिश्र*

23. भारतीय अमृत संस्कृति में तानसेन का योगदान — 191
*डॉ. श्वेता दीपक वेगड*

24. भारताच्या परराष्ट्र धोरणाचे भारतियीकरण — 199
*प्रा. ( डॉ. ) सुपेकर वैशाली प्रशांत*

# 75 Years of Indian Independence and Changing Nature of National Security

*Edited by*


**Prof. (Dr.) C. B. Bhange**
**Dr. Kalpna Vaishy**
**Dr. V. M. Suneela Shyam**
**Mrs. Kanta Verma**
**Dr. Alpana Sharma**
**Dr. Shikha Shrivastva**
**Dr. Bharati Hiremath**
**Mr. Devidas Vijay Bhosale**
**Dr. Sabahat Rafiq Qazi**



Bharti Publications

New Delhi - 110002, India

# CHAPTER 24

# भारताच्या परराष्ट्र धोरणाचे भारतियीकरण

प्रा. ( डॉ. ) सुपेकर वैशाली प्रशांत*

**प्रस्तावना**

जगाच्या अनेक देशांच्या इतिहासाचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, लष्करी आणि आर्थिक सत्तेच्या जोरावर त्या देशांनी आपली सत्ता बळकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे। जिंकलेला देश आपला धर्म, संस्कृती दुसऱ्या देशावर लादण्याचा प्रयत्न करतो. भारत हजारो वर्ष परकीय गुलामगिरीखालीराहिला आहे. 1947 ला भारत स्वतंत्र झाला, त्यानंतर भारताने आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबविण्यास सुरुवात केली, मात्र या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, आपल्या विदेशनीतीची स्वतंत्र विचारप्रणाली फारशी स्वीकारली गेली नाही, मात्र सध्याच्या काळात भारताने आपल्या मूळ भारतीय विचारप्रणालीचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे. प्रस्तुत लेखामध्ये भारताच्या परराष्ट्र धोरणाचे भारतियीकरण कशा प्रकारे होते आहे,यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

आजचे जग अनेक ध्रुवीय आहे. प्रत्येक देश आपला स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र भारताचा जर प्रवास पहिला तर असे दिसते की, आपल्या देशाने कधीच टोकाची स्वार्थी भूमिका स्वीकारलेली नाही. आजपर्यंतकोणकोणत्या

* सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, महाराष्ट्र

घटकांचा स्वीकार करत भारताने आपले वेगळेपण जपले आहे, ते खालील मुद्यांच्या आधारे अभ्यासता येईल.

## 1. शांततेचे धोरण

भारताच्या प्राचीन विचारप्रणालीचा अभ्यास केला असता,जैन,बौद्ध अशा अनेक धर्मामध्ये शांतता, करुणा अशा तत्वांचा पुरस्कार केला आहे. इ.स.पूर्व 6 वे शतक धार्मिक सुधारनामुळे प्रसिद्ध आहे. जैन व बौद्ध धर्म याच काळात उदयास आले. त्यांनी जगाला शांततेचा व समतेचा संदेश दिला. तीर्थंकारमहावीरांच्या काळात जैन धर्माचा प्रसार भारताच्या पूर्वेकडील देशांमध्ये झाला. जगात आजपर्यंत अनेक युद्धे धर्माच्या नावाखाली झाली आहेत. मनुष्य धर्मासाठी मारायाला तयार आहे. पण धर्मासाठी जगायला तयार नाही. भारताला जैन व बौद्ध धर्माची परंपरा लाभलेली असल्याने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताची भूमिका देखील शांततेची असल्याचे दिसून येते. भारतालास्वातंत्र्य मिळाल्यानंतर जगाची अमेरिका आणि रशिया या दोन गटात विभागनीझालेली होती. शांततेचे धोरण, तसेच जागतिक राजकारणात स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची तयारी यांच्या आधारे स्वतंत्र भारताने आपल्या परराष्ट्रीय धोरणाची मांडणी केली होती. शीतयुद्धाच्या संदर्भातीनल लष्करी गटात सामील न होण्याचा, तसेच सर्व देशांशी मैत्रीचे आणि सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करण्याचा दृष्टिकोन त्यामागे होता. त्यातूनच पुढे अलिप्ततावादाच्या चळवळीची सुरुवात झाली. पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आखलेल्या या दृष्टिकोनाचा आणखी एक भाग प्रादेशिकतावादाचा होता. तिसऱ्या जगातील देशांचा–आशियाई, आफ्रिसकी देशांचा जगाकडे बघण्याचा एक पर्यायी दृष्टिकोन मांडण्याचा तो प्रयत्न होता. 1940 व 1950 च्या दशकात या प्रयत्नांना बरेच यश आले. दिल्ली येथे 1947 मध्ये किंवा बांडुंग येथे 1955 मध्ये झालेल्या परिषदा म्हणूनच महत्त्वाच्या होत्या. पुढे या प्रादेशिकवादालाबगल दिली गेली आणि अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाला. पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखाली भारताने केलेले हे योगदान खरोखरीच महत्त्वाचे ठरले; परंतु ज्या अलिप्ततावादी चळवळीशी आपली बांधिललकी होती त्यातून भारताला प्रत्यक्षात कितपत फायदा झाला हा वादाचा मुद्दा ठरला. (श्रीकांत परांजपे, म.टा.)

1954 मध्ये पंडित नेहरू यांनी पंचशील धोरणाचा स्वीकार भारताने केला, परस्पर आदर करणे, अनाक्रमन, परस्पर कारभारात हस्तक्षेप न करणे, समानता व परस्परहित आणि शांतता सहआस्तित्व ही ती पाच तत्वेआहेत. यातील पाच

तत्वेआस्तित्वात असलेल्या जागतिक स्थितीला ज्यामध्ये समाजवाद आणि भांडवलशाही या विरोधी गटांनी एकमेकांना संपविण्याचा प्रयत्न केला होता, त्यावेळी या पंचशील तत्वांचा स्वीकार केल्यास भिन्न-भिन्न विचारप्रणालीवर आधारित असलेले देश सुद्धा सहजीवनाने एकत्र राहू शकतात, हे सांगितले. 1956 मध्ये सोव्हियत नेते खृश्चेव यांनी यूएसएसआरचे अपेक्षित धोरण म्हणून शांततामय सहआस्तित्व जगजाहीर केले.

जगामध्ये अनेक देशांना त्यांच्या गुण-दोषासकट स्वीकारण्याची भूमिका भारतीय संस्कृतीच्याविचारांनामध्येसापडते. सहजीवन आणि सहआस्तित्व हा भारतीय विचारांचा पाया आहे. त्याचे प्रतिबिंब पंडित नेहरूंच्या वसाहतवादी धोरणात आणि मोदी यांनी केलेल्या करोनाच्या काळात इतर देशांना केलेल्या मदतीवरून दिसून येते. अनेक देशांना माफक दरात करोनावरील औषधांचा पुरवठा भारताने केला.

## 2 ) नैतिक मूल्यांचा स्वीकार

राजकारण मग ते राष्ट्रीय असो किंवा आंतर्राष्ट्रीय असो, तिथे नैतिकता व व्यावहारिकता यांचा मेळ घडवून आणावा लागतो. भारताचा प्राचीन ग्रंथ महाभारत मध्ये या विचाराचे अधिष्ठान सापडते. भारताच्याराजनयातअनुप्रसार, जागतिक व्यापार, आणि हवामानबदल यांच्या बाबतीत नैतिक मूल्यांशी असलेली बांधिलकीसापडते. भारताचे स्वहित जगातील अनेक देशांच्या जागतिक घडामोडीत सापडते. सध्या जागतिक व्यवस्थेत बहुढंगी, बहुविध आणि एकमेकांना प्रभावित करणारेपरस्परविरोधी घटक एकत्र नांदत आहेत. धार्मिक, जातीय, भाषिक अशा अनेक परस्परविरोधी घटकांना सामावून घेणारी भारतीय संस्कृती यामुळेच जागतिक अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरू शकते.

## 3 ) आत्मनिर्भरता

जागतिक पातळीवर एकमेकांच्या सहकार्याने धोरण निश्चिती करून सगळ्याच देशांनी आपापले भले करून घ्यावे आणि एकमेकांच्या हिताला जाणीवपूर्वक बाधा न पोहचवता आपले हितसंबंध सुदृढ करावेत, अशी जागतिकीकरणाची व्यवस्था मागील शतकात रूढ झाली. पण एकविसाव्या

शतकामध्ये त्यात काही महत्त्वाचे बदल होत आहेत. जगभरस्वत: च्यादेशापुरता विचार करणारी नवी विचारधारा बलवत्तर होऊ लागली आहे. यानिमित्ताने अर्थकारणाच्या आणि समाजकारणाच्यादृष्टिने या जागतिक व्यवस्थेकडे पाहणे, आवश्यक ठरले आहे. भौतिक साधनांतून मिळणारा आनंद हा तात्पुरता असतो. शाश्वत, चिरकाल टिकणारा आनंद प्राप्त करायचा असेल, तर आत्मनिर्भर होणे गरजेचे आहे. आत्मनिर्भरतेची कास धरून शाश्वत समाधान कसे प्राप्त करता येऊ शकते? उद्धरेदात्मनात्मानंनात्मानमवसादयेत्' ही भगवद्गीतेतील मांडणी किंवा 'अप्प दीप भव' हा महात्मा गौतम बुद्धांचा संदेश, या सर्वातील समान दृष्टी लक्षात घेतली, तर 'आत्मनिर्भरभारता' ची कल्पना नवीन, म्हणजे अ-परिचित वाटण्याचे कारण नाही. 'जोडोनिया धन, उत्तम वेव्हारे : उदास विचारे वेच करी' ही समर्थ रामदासांची शिकवण ज्या प्रमाणे आपल्या सामर्थ्याचे, समृद्धीचे अंतिम लक्ष्य विश्वकल्याणाचे आहे हे अधोरेखित करते, तोच आशय पंतप्रधानांच्या मांडणीतील आत्मनिर्भरतेचा आहे. यात एक सनातन दृष्टी आहे; निदान संकटकाळात तरी जी नीट अंगीकारायला हवी. ती व्यक्तिगत आणि सामूहिक जबाबदारीची तीव्र जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न आहे, जगात काय घडते आहे आणि भविष्यात काय घडू शकते त्याबद्दलचे भान निर्माण करण्याचा खटाटोप आहे आणि बदलल्या वैश्विक वास्तविकतेची चाहूलही आहे.

उद्धरावा स्वये आत्मा!' ही सनातन भारतीय दृष्टी आहे. आपल्या उद्धारासाठी आणखी कोणीतरी कोठून तरी येतील ही, 'असेल माझा हरी...' पद्धतीची विचारसरणी नाकारून, ज्याचा तोच किंवा 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' ही शिकवण आपल्या देशात अनेकांनी जनमानसातरुजविण्याचे प्रयत्न केले आहेत. 'आत्मनिर्भरभारता' ची हाक ही त्याच परंपरेतले पुढचे पाऊल आहे.म. गांधी व इतर अनेकांप्रमाणेच स्वदेशी आणि विकेंद्रीकरण या दोन संकल्पनांवर भर दिला होता. ही दोन्ही सूत्रेआत्मनिर्भरतेकडेनेणारीच आहेत. पंतप्रधानांनी स्थानीय उत्पादने व उप्तादकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'लोकल' बाबत 'व्होकल' होण्यासंदर्भात केलेले आवाहनही, हीच दृष्टी अधोरेखित करणारे आहे. तेव्हा सारांशाने सांगायचे तर आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेचा पंतप्रधानांनी उच्चारवाने केलेला पुरस्कार, ही आपल्या पूर्वसूरींनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकेची नव्या संदर्भात केलेली मांडणी आहे, असे वर्णन केल्यास ते चुकीचे ठरू नये. 'नित्य नूतन, चिर पुरातन' हे

भारतीय जीवनदृष्टीचे एक पायाभूत सूत्र आहे व त्याचेच प्रत्यंतर आत्मनिर्भर योजनेच्या मांडणीतून येते.

आत्मनिर्भरतेच्याअभियानाचा संबंध केवळ आंतरराष्ट्रीय राजकारणाशी नाही. देशांतर्गत विषयांमध्येही आत्मनिर्भरता आवश्यक आहे. ग्रामस्वराज्य हा या अभियानाचा प्रारंभ बिंदू आहे. महात्मा गांधींनी 26 जून 1924 च्या 'यंगइंडिया' च्या अंकात जे म्हटले होते, ते एकप्रकारेआत्मनिर्भरतेच्या धोरणाचे मर्म आहे. गांधीजी म्हणाले होते-'भारतीय संस्कृतीची प्रतिभाशक्ती अबाधित राखणे, हीच माझी स्व-राज संकल्पना आहे. मला नवी मुळाक्षरे गिरवायची आहेत, पण ती (सर्व) भारतीय पाटीवर! मी पश्चिमेकडून उधारीवर अनेक बाबी घेण्यास तयार आहे, पण (हे) तेव्हाच (होईल) जेव्हा मी ही उधारी बऱ्यापैकी व्याजासह परत करण्याच्या स्थितीत येईन.'

**समारोप·**

अशा प्रकारे वरील सर्व मुद्यांचा अभ्यास करता असे सांगता येईल की, भारताच्या परराष्ट्र धोरणामध्ये भारताची जी मूळ विचारप्रणाली आहे, तिला अलीकडे जास्त प्राधान्य देण्यात येत आहे. कोविड 19 मुळे जागतिक परिस्थिती बदलत चालली आहे.अनिश्चित अशा परिस्थितीमध्ये सर्वात मोठी लोकशाही असलेल्या, स्वतंत्र विचारप्रणाली असलेल्या भारतासारख्या देशाला खूप मोठे स्थान मिळेल यात शंका नाही. महाभारत या ग्रंथामध्ये मोठा मासा छोट्या माशाला गिळंकृत करतो, असा उल्लेख आहे, त्याचप्रमाणे जगामध्ये देखील अत्यंत विषम जागतिकीकरण, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी गट, दहशतवादी संघटना, निरंकुशवादी विचार हे मास्त्यन्यायाचेच रूप आहे. आजच्या काळात धर्म म्हणजे विचार आणि नियमावर आधारित जागतिक व्यवस्थेची निर्मिती आणि त्याचे पालन असा अर्थ घ्यावा लागेल आणि भारताचा मूळ धार्मिक गाभा अशाच स्वरूपाचाआहे. सध्या चीनचा वाढता वर्चस्ववाद सर्वांच्या दृष्टीने अवघड बनत चालला आहे. चीन कडून मदत घेणे म्हणजे राजकीय स्वातंत्र्याचा बळी देणे अशी अनेक देशांची भावना बनत चालली आहे. उलट भारताचे विकासात्मक सहकार्याचे प्रारूप हे इतर देशांना सबळ करण्याचे आश्वासन देते. भारताच्या विचारामध्ये विवेकवाद आहे आणि तो संपूर्ण जगाला नक्कीच आशदायी ठरू शकतो।

## संदर्भ


1. Varma m.p., Modern Indian political thinking, p. 374.
2. T.H.Green, political obligation, p.129.
3. Jawaharlal Nehru, The discovery of India, p. 22
4. Achrya Kraplani, Gandhi, Tagore, Nehru publication division, Delhi 1950, p.73.
5. शैलेन्द्र देवळानकर, परराष्ट्र धोरणाची नवी परिमाणे फेब्रुवारी 18,2020.
6. सचिन दिवाण, भारताचे परराष्ट्र धोरण एका निर्णायक वळणावर, नोव्हेंबर 24,2020.
7. शैलेन्द्र देवळानकर, मोदी कालखंडातील भारताचे परराष्ट्र व संरक्षणधोरण: उपलब्धी, विपुल, आव्हाने बाकी, दिशा, 4 एप्रिल 2019.
8. विक्रांत पांडे, भारताचे नेबरहुड फर्स्ट परराष्ट्र धोरण, 13 जून 2019.
9. सचिन धृव्ये, भारत, कोरोंनावायरस, आणि पंडित नेहरूंची शांततामय सहजीवन तत्वाची उपयुक्तता, नवज्योत, Vol-IX/Issue-II.